# महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालयाकरिता नियम

1. विधानपरिषदेच्या किंवा विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांच्या उपयोगाकरिता ग्रंथालयाची योजना आहे, परंतु प्रधान सचिवांची पूर्वपरवानगी घेवून सरकारच्या कोणाही राजपत्रित अधिकाऱ्यांना ग्रंथालयातून पुस्तके मिळू शकतील.
2. (अ) कामकाजाच्या दिवशी सकाळी 11 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ग्रंथालयातून केंव्हाही पुस्तके मिळू शकतील.

   (ब) ज्या दिवशी विधानपरिषदेची किंवा विधानसभेची बैठक असेल त्या दिवशी विधानपरिषदेचे किंवा विधानसभेचे अधिवेशन तहकूब होईपर्यंत ग्रंथालय सुरू राहील.
3. पुस्तक मिळाल्याची ग्रंथपालांकडे पावती दिल्याखेरीज ग्रंथालयातून पुस्तक देण्यात येणार नाही. ह्या प्रयोजनार्थ पावत्यांचे छापील नमुने ग्रंथालयात आणि कार्यालयात मिळू शकतात. पुस्तक परत करण्यात आल्यावर पुस्तक परत मिळाल्याची पावती मागून घ्यावी.
4. सन्माननीय सदस्यांनी -

   (अ) विधानपरिषदेचे किंवा विधानसभेचे अधिवेशन चालू असताना घेतलेली पुस्तके, ती घेतल्यापासून सात दिवसांचे आत परत केली पाहिजेत.

   (ब) अन्य कोणत्याही वेळी घेतलेली पुस्तके ती घेतल्यापासून 15 दिवसांचे आत परत केली पाहिजेत.
5. 24 तासांची नोटीस देवून कोणत्याही वेळी कोणतेही पुस्तक प्रधान सचिवांना परत मागविता येईल.
6. कोणाही सन्माननीय सदस्यांकडून आलेले पुस्तक, ते दुसऱ्या कोणाही सन्माननीय सदस्यास नको असेल तर ते त्यांना पुन्हा देता येईल.
7. नियम 4 मध्ये दिलेल्या मुदतीपेक्षा अधिक दिवस कोणाही सन्माननीय सदस्यांकडे पुस्तक किंवा पुस्तके असतील तर त्याना आणखी दुसरे पुस्तक देण्यात येणार नाही.
8. कोणत्याही सन्माननीय सदस्यास एकाच वेळी ग्रंथालयाची दोनपेक्षा अधिक पुस्तके आपणाजवळ ठेवता येणार नाहीत. जर एखाद्या सन्माननीय सदस्यास दोनपेक्षा अधिक परंतु एकूण चार पुस्तके पाहिजे असल्यास प्रधान सचिवांचे आदेश घेण्यात यावेत.
9. प्रधान सचिवांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय संदर्भग्रंथ ग्रंथालयाबाहेर देण्यात येणार नाहीत.
10. दोन स्मरणपत्रांनंतर जर पुस्तके परत करण्यात आली नाहीत तर त्या पुस्तकांची किंमत ही, सन्माननीय सदस्यांच्या पुढील महिन्याच्या पहिल्या दिवशी मिळणाऱ्या वेतनामधून वसूल करण्यात यावी.
11. ग्रंथालयातील पुस्तकांवर टिपा लिहिता किंवा खूणा करता कामा नये.
12. प्रेक्षकांना ग्रंथालयात प्रवेशाची परवानगी नाही.

13. ग्रंथालयात शांतता राखली पाहिजे.

14. ग्रंथालयातील टेबलावर "सूचना पुस्तक" ठेवण्यात येईल आणि त्या पुस्तकात नवीन पुस्तके विकत घेण्याबाबत किंवा ग्रंथालयासंबंधातील अन्य कोणत्याही गोष्टीबाबत करावयाच्या असतील त्या सूचना नमूद करता येतील.

15. विधानसभेचे किंवा विधानपरिषदेचे अधिवेशन चालू असताना पुढील प्रकाशने ग्रंथालयाच्या टेबलावर ठेवण्यात येतील.-

(अ) महाराष्ट्र राजपत्राचा अगदी अलिकडील अंक.

(ब) भारत सरकारच्या राजपत्राचा अगदी अलिकडील अंक.

(क) विधानपरिषदेचे किंवा विधानसभेचे मागील अधिवेशन समाप्त झाल्यानंतर आलेल्या सर्व प्रशासन अहवालांच्या दोन दोन प्रती.

(ड) दोन्ही सभागृहांसमोर प्रलंबित असलेल्या विधेयकांच्या प्रत्येकी दोनप्रती.

(इ) ग्रंथालयात येणाऱ्या वर्तमानपत्रांचे आणि नियतकालिकांचे अगदी अलिकडील अंक.

16. ह्या नियमांत, 'प्रधान सचिव' म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचे /विधानपरिषदेचे 'प्रधान सचिव'.